**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष श्रावणदास राठोड
भवानीपेठ, मु.पो.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, समाजसेवा मित्र मंडळ संचलित,
कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, समाजसेवा मित्र मंडळ संचलित,
कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३३ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष श्रावणदास राठोड
भवानीपेठ, मु.पो.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, समाजसेवा मित्र मंडळ संचलित,
कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा, जि.सोलापूर
श्री.गुलाबराव कोंडिराम बागल

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, समाजसेवा मित्र मंडळ संचलित,
कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा, जि.सोलापूर
श्री.रमेश शामराव कवडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.१००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय संस्था व शालेय समिती स्थापन झालेपासून आजपर्यंतची माहिती. कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयासाठीची सन १९७८ ते १९८८ या कालावधील शालेय समितीच्या अध्यक्ष, सचिवांसह संपूर्ण संचालकांच्या नावांची निवासी पत्त्यासह यादी, कै.सुरेश विष्णु महाजन यांच्यावर संस्थेची, तसेच शाळा समितीमधील असलेल्या पदाची कोणती जबाबदारी होती, १ एप्रिल १९७५ पासून शाळेसाठी वेतनाशिवाय झालेल्या खर्चासंबंधीची माहिती, किर्दीच्या पानांच्या छायांकित प्रती, सौ.शरिफा जाफर शेख यांनी दि.२१.१.१९८१ ते २०.४.१९८१ या कालावधीमध्ये ९० दिवसांची रजा उपभोगली आहे, त्यासाठी शालेय समितीने दि.१४.१.१९८१ रोजी ठराव क्र.२ नुसार मंजुरी दिली त्या ठरावाची छायांकित प्रत व सौ.शेख यांच्या मस्टरवरील रजाकाळातील पानांची छायांकित प्रत. | |

## विवेचन

कर्मवीर अण्णासाहेब जगताप विद्यालय या संस्थेच्या शालेय समितीच्या व सौ.शरिफा जाफर शेख यांच्या रजेच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील स्वीकारले नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.सुभाष श्रावणदास राठोड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१९.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला वेळोवेळी चुकीची पत्रे दिली व पर्यायाने माहिती देण्यास नकार दिला. मुख्याध्यापकांनी जन माहिती अधिकारी म्हणून सर्व माहिती संकलित करुन देणे आवश्यक असताना दिली नाही, म्हणून त्यांना शास्ती लावावी, अशी मागणी श्री.राठोड यांनी

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविली व सुनावणीत त्याचाच पुनरुच्चार केला. दि.१.४.१९७५ पासून ऑगस्ट २००७ पर्यंतच्या किर्दीच्या छायांकित प्रतीची मागणी श्री.राठोड यांनी मूळ अर्जात केली होती. परंतु दि.१.४.१९७५ ते १९९० या काळातील किर्दीच्या प्रती मिळाल्या तरी चालतील, असे सुनावणीदरम्यान श्री.राठोड यांनी मान्य केले. समाजसेवा मित्र मंडळ, करमाळा या विश्वस्त संस्थेमार्फत कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय चालविले जाते. संस्थेच्या स्थापनेपासून-सुमारे सन १९६६ पासून दि.९.१०.२००३ पर्यंत श्री.राठोड या संस्थेचे विश्वस्त होते. त्यांनी मागितलेली माहिती त्यांना पूर्णपणे ज्ञात असतानाही व संस्था अगर सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे असणारी माहिती मुख्याध्यापकांकडे मागण्यामागे त्यांचा मुख्याध्यापकांना त्रास देण्याचा उद्देश आहे. तरीही त्यांना माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक श्री.रमेश शामराव कवडे यांनी केले. श्री.राठोड यांचे अपील आपल्याला मिळाले नाही, आपल्यापर्यंत ते न आल्यामुळे ते न स्वीकारण्याचा प्रश्न नाही, असे अपिलीय प्रधिकारी तथा सचिव, समाजसेवा मित्रमंडळ, करमाळा, जि.सोलापूर श्री.गुलाबराव कोंडिराम बागल यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अपीलकर्त्याने पोस्टमनच्या नोंदीसह परत आलेले रजिस्टर्ड टपाल सादर केले. त्यावर 'अपिलीय प्राधिकारी' असे लिहिलेले आहे, परंतु सचिव असा उल्लेख नाही. तसेच पत्ता अपूर्ण आहे, असे श्री.बागल यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता संस्थांतर्गत वादात माहितीच्या अधिकाराचा परस्परांविरुध्द वापर केला जात आहे, असे दिसते. तरीही मुख्याध्यापकांनी संस्थेकडून कागदपत्रे घेऊन श्री.राठोड यांनी आठ दिवसांत सशुल्क माहिती द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने दिला.

आयोगाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविले. माहिती देण्यास विलंब झाल्यामुळे ती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी करुन श्री.राठोड यांनी शुल्क भरण्यास नकार दिला. माहिती समक्ष देऊ केली असता पोहोच देण्याचे नाकारले, त्यामुळे रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, मात्र किर्दीच्या ७३५ पृष्ठांच्या प्रती त्यांनी शुल्क न भरल्यामुळे दिल्या नाही, असे मुख्याध्यापक श्री.रमेश शामराव कवडे यांनी दि.४.८.२००८ व दि.१०.९.२००८ च्या पत्रान्वये

आयोगाला अवगत केले. विश्वस्त पद रद्द झाल्यामुळे त्रास देण्याच्या उद्देशाने श्री.राठोड माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत, असे श्री.बागल यान दि.१०.९.२००८ च्या पत्रात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने विचारात घेता अपीलकर्त्याने माहिती हवी असल्यास शुल्क भरणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुनिल शंकर जाधव
द्वारा सिद्राम महादेव कांबळे
प्लॉट नं.३०/११, केदार नगर,
मोरेवाडी, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २४.६.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>कोल्हापूर, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी सौ. संगिता चौगुले<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर सौ. संगिता चौगुले | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br> सोबत छायांकित प्रत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनील शंकर जाधव यांनी दि.५.६.२००८ रोजी झालेल्या शिपाई पदाच्या परीक्षेबाबतची माहिती मागितली होती. परंतु त्यावेळी भरती प्रक्रिया चालू असल्यामुळे माहिती देता येणार नसल्याचे श्री. जाधव यांना कळविले व भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर माहिती दिली. त्यांनी केलेले प्रथम अपील नाकारण्यात आले. इतर उमेदवारांच्या उत्तरपत्रिका आदी माहिती त्यांनी मागितली होती. तसेच निवड झालेल्या उमेदवारांची व आपली गुणपत्रिका यांची सविस्तर पडताळणी होऊन आपल्या उत्तर पत्रिकेमध्ये काय कमी आहे, याची सविस्तर माहिती मिळावी. जाणीवपूर्वक नापास केल्यामुळे माझ्याप्रमाणेच अन्य उमेदवारांवर अन्याय झाला आहे. इत्यादी बाबी श्री. जाधव यांनी अर्जात नमूद केल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्या येत नाहीत. ऊर्वरित माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर सौ. संगिता चौगुले व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २५.०९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले
स.नं.४९/, प्लॉट क्र.४४, चंदननगर, नगर रोड, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३६ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले
स.नं.४९/, प्लॉट क्र.४४, चंदननगर, नगर रोड, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.बा.वि.जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.७.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | विनापरवाना १२ झाडे दि.१०.१०.२००५ रोजी तोडली आहेत. याबाबत ११.१०.२००५ रोजी तक्रार केली. नंतर फोटो काढण्यात आले, त्यावर काय कारवाई केली आणि केव्हा केली, नसेल तर करणार आहेत काय? |

## विवेचन

दि.११.१०.२००५ रोजी विनापवाना वृक्षतोडीबद्दलची तक्रार आपण केली होती. त्यावर काय कार्यवाही केली, याची माहिती अपीलकर्ता श्री.वसंत आप्पासाहेब चौगुले यांनी दि.२७.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरही पाठविले नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२७.५.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

दि.१४.६.२००६रोजी केलेल्या अर्जाला आपण दि.२८.६.२००६ रोजी विहित मुदतीत उत्तर दिले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.शिरीष यादव यांनी केले. आयोगाकडे अपील केल्यानंतर आपल्याला टपालाने माहिती पाठविली गेली, असे प्रतिपादन श्री.चौगुले यांनी केले. जन माहिती अधिकारी म्हणतात ते पत्र आपल्याला मिळाले नसल्याचे श्री.चौगुले यांनी सांगितले. श्री.चौगुले यांना पाठविलेल्या पत्राची जावक रजिस्टरला असलेली नोंद आयोगाला सादर करावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्रीमती निलिमा केरकट्टा यांनी सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या निदर्शनास आणला. परंतु आपल्याला ही नोंद पाहण्यासाठी मिळालेली नाही, अशी तक्रार श्री.चौगुले दि.२९.१२.२००८ पासून दि.२१.८.२००९ पर्यंत सातत्याने करीत आले आहेत. आयोगाने केलेल्या विचारणेनुसार अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (उद्यान), पुणे महानगरपालिका यांनी दि.५.९.२००९ रोजी

संबंधित रजिस्टरच्या प्रतींसह अहवाल आयोगाला सादर केला. संबंधित पत्राची प्रत श्री.चौगुले यांना दिली असता 'आता याबाबतची माहिती देऊन किंवा पत्र देऊन काय उपयोग होणार आहे, ज्यावेळचे काम त्याच वेळी झाले असते तर पुढील सर्व अनर्थ टळले असते, आता ही पत्र व उत्तर घेऊन मी काय करु,' असे पोहोचपत्रावर लिहून दिल्याची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (उद्यान) यांनी अहवालासोबत सादर केली. या बाबी लक्षात घेता अपीलकर्त्याची मुख्य मागणी बेकायदेशीर वृक्षतोड करण्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याची होती. त्यानुसार संबंधितांवर पुणे महानगरपालिका न्यायालयात दाखल केलेल्या फौजदारी खटल्याची माहितीही पत्रव्यवहारात देण्यात आल्याचे दिसते.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. रामचंद्र बबन जाधव,
प्रथमेश को-ऑप. हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं. ८४, खोली क्र.३६,
आर.एस.सी. (१), गोराई (१),
बोरीवली (पश्चिम), मुंबई-९१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार फलटण, — उत्तरवादी
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३६/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.संभाजी हेरवाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.१०.०६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २०.११.०६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २४.११.०६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १८.११.०६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनीबाबतचा दावा क्र. २/०६ वर दि. ३१.८.१९७६ रोजी केलेल्या आदेशाची प्रत

## विवेचन

कमाल जमीन धारणा कायद्या अंतर्गत मिळालेल्या जमिनीबाबत दि.३१.८.१९७६ रोजी झालेल्या आदेशाची प्रत अपीलकर्ता श्री.रामचंद्र बबन जाधव यांनी मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जाधव यांनी याच मागणीसाठी सातत्याने अनेक अर्ज व पत्रव्यवहार केला असून, माहितीच्या अधिकारातही अर्ज व अपिले केली आहेत. संबंधित कागदपत्र ब वर्गातील असून तीस वर्षांची मुदत उलटून गेल्यामुळे अभिलेखात उपलब्ध नाहीत, हे श्री.जाधव यांना स्पष्ट करुन सांगण्यात आले आहे, तसेच क्षेत्राबाबतचे फेरफार उतारे देऊन आवश्यक तर फेरतपासणीसाठी अर्ज करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण श्री.संभाजी हेरवाडे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण श्री.हिम्मत खराडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.जाधव यांच्या अपील क्र.७ ते १५/२००७ मध्येही याच प्रकारची मागणी होती व संबंधित अभिलेख उपलब्ध नसल्याची आपली खात्री पटली आहे, त्यामुळे ही अपिले निकाली ठेवावीत,असे निवेदन श्री.जाधव यानी तेव्हा दिले होते.

वरील बाबी लक्षात घेता हे अपिलही त्याच कागदपत्रांसंबंधी असल्यामुळे आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आयोग

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१६.९.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५३८ / २००९ सांगली | श्री.संजय विजय भिडे ११११/१, उत्तर शिवाजीनगर, कै. विष्णु विनायक भिडे मार्ग, गणपती गॅस गोडवून जवळ, सांगली | प्रशासन अधिकारी (आस्था.), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त तथा अपिलीय प्राधिकारी , सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका , सांगली | महानगरपालिकेत दि.६-८-०८ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीत निवड समितीने वरिष्ठ लिपीक या पदासाठी घेतलेल्या निर्णयाची माहिती |
| २ | ५३९ / २००९ / सांगली | श्री.संजय विजय भिडे ११११/१, उत्तर शिवाजीनगर, कै. विष्णु विनायक भिडे मार्ग, गणपती गॅस गोडवून जवळ, सांगली | प्रशासन अधिकारी (आस्था.), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त तथा अपिलीय प्राधिकारी , सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका , सांगली | सांगली मिरज, आणि कुपवाड शहर महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती. |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.संजय विजय भिडे यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याने त्यांचे समाधान झाले असून त्यांची वरील अपिले निकाली काढण्याबाबत अनुक्रमे दि. १८ /०८/२००९ व १७/८/२००९ रोजीच्या अर्जान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले (अपील क्र.५३८ / २००९ / सांगली, ५३९ /२००९/ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन विष्णू घोलप
साई ब, सहकारी गृहरचना संस्था, सदनिका १+२,
स.नं. ६९/१ड/६ब, सिंहगड रोड, वडगाव बु. पुणे-४१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४२/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.०८.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विलास कानडे<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहायक कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामदास बापू जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>वडगाव बु. येथील साई अपार्टमेंटस् या इमारतीचा ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या अथवा त्यास सादर केलेल्या इमारतीच्या नकाशाची प्रत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सचिन विष्णू घोलप यांनी वडगाव बु. येथील साई अपार्टमेंटस या इमारतीच्या नकाशाची मान्यताप्राप्त सही-शिक्याची प्रत न मिळाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१२.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपिलाचा समावेश होता.

माहितीसाठी आपल्याला वेगवेगळ्या कार्यालयाकडे संपर्क साधावा लागला. वडगाव बु. हे गाव पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर सन १९९१ मध्ये तेथील ग्रामपंचायतीचे रुपांतर महानगरपालिकेच्या संपर्क कार्यालयात झाले. तेथील सर्व दस्तऐवज महानगरपालिकेकडे सुपूर्त केल्याचे तेव्हा जाहीर करण्यात आले. परंतु संबंधित नकाशे आदि दस्तऐवज महानगरपालिकेकडे आले नसल्याचे महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून उत्तर देण्यात आले. त्यामुळे जाणीवपूर्वक आपली दिशाभूल केली जात आहे, व दस्तऐवज दिले जात नाहीत, अशी तक्रार श्री. घोलप यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात लेखी निवेदनाद्वारे नोंदविली. संबंधित कागदपत्रांबाबतची वस्तुस्थिती श्री. घोलप यांना वारंवार स्पष्ट करण्यात आली. दि.१३.६.२००८ रोजी गट विकास अधिकारी कार्यालयाच्या चार्जयादीतील अभिलेखांची समक्ष हजर राहून शहनिशा करावी, असे उभय घटकांमध्ये ठरल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. त्यानुसार गट विकास अधिकारी, हवेली यांच्याकडून मिळालेल्या चार्जयादीची तपासणी आपण केली. चार्जयादीप्रमाणे तपासणी केली असता संबंधित कागदपत्र नसल्याचे आढळले, असे लेखी निवेदन श्री.घोलप यांनी संपर्क अधिका-यांना दिले. तसेच संबंधित इमारतीच्या नोंदीसमोर अनधिकृत बांधकाम असल्याचे नमूद केलेले असल्यामुळे मान्यताप्राप्त नकाशा उपलब्ध नाही, असे संपर्क अधिका-यांनी श्री. घोलप यांना दि.६.८.२००९ रोजी कळविले. त्याची पोहच श्री. घोलप यांनी दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.८.२००९ रोजी सुनावणीच्या वेळी हा अहवाल आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.शिवाजी आनंदा कापसे
मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा शल्यचिकीत्सक,
छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर जि.कोल्हापूर ४१६ १०१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर जिल्हा कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४२/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५-०९-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १९.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | ०९-०१-२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :** सी.पी.आर.रुग्णालय, कोल्हापूर येथील कर्मचाऱ्यांचे हलचल रजिस्टर, हजेरीपत्रक दैनंदिनी बाबतची माहिती, तसेच वेळेवर उपस्थित न राहणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार, याचा खुलासा व कार्यालयामधील कार्यक्षमता, पारदर्शकता वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणार, याची माहिती | |

## विवेचन

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाची दखल घेतली नाही, दिलेली माहिती अपुरी दिली, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.९.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली, त्यास अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे उपस्थित नव्हते.

श्री. कापसे यांना विहित मुदतीत उत्तर पाठविण्यात आले होते, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मधील प्रपत्रात म्हटले आहे. ते मिळाले नाही, असे श्री. कापसे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्री. कापसे यांनी अर्जात चुकीचा पत्ता दिल्याने पत्र परत आल्याची छायांकित प्रत अपिलीय प्राधिकारी डॉ. व्ही. बी. यादव यांनी लेखी निवेदनासोबत आयोगाला सादर केली आहे. तसेच रुग्णालयाच्या त्या त्या विभागात जाऊन त्यांना आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे, सर्व नोंदवह्या दाखविण्यात आल्या. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ अन्वये द्यावयाची माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली असून कागदोपत्रीही उपलब्ध आहे. अन्य कोणतीही माहिती त्यांना हवी असल्यास दिली जाईल, असे डॉ. यादव यांनी लेखी निवेदनात नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली लेखी निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता श्री. कापसे यांना सर्व माहिती देण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती आहे. माहिती विलंबाने मिळाल्याचे श्री. कापसे यांचे

म्हणणे आहे, परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत पत्रव्यवहार केला आहे. विहित मुदतीत प्रथम अपिलावरील कार्यवाही करण्याची समज अपिलीय प्राधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. शंकर विष्णू साळोखे
मु. पो. तळंदगे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** निवासी नायब तहसीलदार,
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४३/ २००९/कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५-३-२००९ व दि.१६.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.३.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** १) तळंदगे येथील गट नं. ४७५ चे दि. १.१.२००१ ते १.१.२००८ या आठ वर्षांच्या कालावधीतील ७/१२ उतारे, वीज पाण्यासह तसेच गट नं. ४७५ चा दि. २३.१०.२००८ चा ७/१२ उतारा २) गट नं. ६५८,५५१ चे ८अ चे उतारे ३) ४२६८ व ४२५३ या नंबरचे डायरी उतारे इ.कागदपत्रे दि. ३०.३.२००९ पुर्वी मिळावे. | |

## विवेचन

मागणी केलेले ७/१२ उतारे, ८अ चे उतारे व डायरी उतारे यासाठी जनमाहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी अवास्तव शुल्काची मागणी केली व दिशाभूल करणारी माहिती दिली, या कारणावरून अपीलकर्ता श्री. शंकर विष्णू साळोखे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. साळोखे यांनी त्यांच्या दि. ५.३.२००९ व दि. १६.३.२००९ च्या अर्जान्वये अनुक्रमे जिल्हाधिकारी, कोल्हापूर व गावकामगार तलाठी, तळंदगे यांच्याकडे माहिती मागितली. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी अर्ज संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.३.२००९ रोजी वर्ग केला. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायाब तहसीलदार, हातकणंगले यांनी दि. २६.३.२००९ च्या पत्रान्वये श्री. साळोखे यांना १४ पृष्ठांच्या माहितीसाठी नियमानुसार रु २८/- शासकीय कोषागारात भरणा करण्यास कळविले. तथापि श्री. साळोखे यांनी शुल्क भरुन माहिती नेली नसल्याचे जन माहिती आधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांनी त्यांच्या दि. ५.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. तसेच श्री. साळोखे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले नसल्याचे अपीलकर्त्याने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे:

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता श्री. शंकर विष्णू साळोखे यांनी माहिती आवश्यक तर शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

**पुणे**
**दि.२५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कांचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग,
पुणे-१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (पथ विभाग),
वाहतूक नियोजन, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कांचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे
तर्फे प्रतिनिधी श्री. श्रीनिवास बोनाला

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (पथ विभाग),
वाहतूक नियोजन, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. विनायक जाधव, कनिष्ठ अभियंता

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन १९८५ ते ३०.६.२००६ या कालावधीतील सायकल मार्गासंबंधी टप्यानुसार संपूर्ण माहिती, प्रस्तावित मार्ग, शिफारस सूचना, प्रशासन प्रस्ताव, स्थाई समिती, सर्वसाधारण समिती, प्रत्यक्ष कार्यान्वित, आजची स्थिती, झालेला अद्यावत खर्च, नियोजित मार्ग, खर्च अंदाज, कार्यवाही योजना निर्धारित तारखेसह

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सायकल मार्गाच्या संबंधातील माहिती अपीलकर्ता श्री. जुगल श्रीनिवासजी राठी यांनी जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता (पथ विभाग), वाहतूक नियोजन, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. माहिती अपुरी व चुकीची दिल्याच्या कारणावरून श्री. राठी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलाचा आदेश व पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री. राठी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण मागितलेल्या नऊ मुद्दयांपैकी चार मुद्दयांची माहिती माहिती दिली नाही, बाकीची माहिती चुकीची, अपुरी व मोघम होती. १९८७ च्या विकास आराखड्याप्रमाणे असल्याने त्याबाबत शासनाकडे संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले. कामाचे नियोजन व अंदाजित खर्च या बाबतची माहिती अपुरी व चुकीची दिली, असे प्रतिपादन श्री. राठी यांनी केले. सायकल मार्ग हा पुण्यातील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहे. त्याबाबतची दखल पुणे महानगरपालिकेने गांभीर्याने घ्यावी, असे श्री. राठी यांनी नमूद केले.

श्री. राठी यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती. याच संदर्भात काही माहिती दि.२३.८.२००६ रोजी त्यांना दिलेली होती. सहाय्यक अभियंता, ( वाहतूक नियोजन ) यांच्याकडे वर्ग केल्यानंतर त्यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती दि. ४.९.२००६ रोजी दिली. श्री. राठी यांच्या अपिलाची सुनावणी दि. ५.१०.२००६ रोजी झाली. त्यावेळी सायकल मार्गाची यादी देण्यात आली व काही मुद्दयांची माहिती दि. १०.१०.२००६ रोजी देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी

केले. दोन मार्गांवर काम चालू असल्याचे उत्तरात नमूद केले असले तरी प्रत्यक्षात काम चालू नव्हते. तसे आपण प्रथम अपिलाच्या अर्जातही नमूद केले होते, असे श्री. राठी यांनी सांगितले. मात्र दिलेली माहिती चुकीची नाही, असे जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता (पथ विभाग), वाहतूक नियोजन, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. विनायक जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या वतीने श्री. श्रीनिवास बोनाला यांनी प्रतिपादन केले.

श्री. राठी यांना उत्तर दिले, तेव्हा उत्तरात नमूद केल्याप्रमाणे कामे चालू असल्याचा पुरावा जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्याची पूर्तता अद्याप झालेली नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. जुगल श्रीनिवासजी राठी यांना उत्तर दिले तेव्हा काम चालू असल्याबाबतचा पुरावा सादर करण्याच्या आदेशाचा अनुपालन अहवाल सादर न केल्याबद्दलचा खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २८.९.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा, अन्यथा ते शास्ती व तदनुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १८ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे केलेल्या खालील अपिलांवर उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | ५४६ / सातारा | श्री. जर्नादन गजानन आडके<br>मु. पो. डिस्कळ, ता. खटाव,<br>जि. सातारा | सचिव,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव,<br>जि. सातारा | अध्यक्ष,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव,<br>जि. सातारा |
| | | **मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) :**<br>१) अपीलकर्त्याची सभासद वर्गणी न स्वीकारल्यामुळे अपीलकर्त्याने बँक ऑफ इंडियामध्ये संस्थेच्या खात्यात (खाते क्र. S.B. १९३९ ) जमा केली. परंतु त्याबाबत कसलीही माहिती अथवा पावती मिळाली नाही. त्याबाबतचा लेखी खुलासा मिळावा.<br>२) आपल्या गावातील सर्व साधारणपणे १५०-२०० विद्यार्थी परगावी शिक्षणासाठी जातात. याचा अर्थ आपल्या संस्थेचे व्यवस्थापन सक्षम नाही. तरी आपल्या संस्थेचा शैक्षणिक दर्जा खालवलेला आहे काय, याबाबतचा खुलासा | | |
| २ | ५४७ / सातारा | श्री. तुकाराम बाळा जाधव<br>मु. पो. डिस्कळ, ता. खटाव,<br>जि. सातारा | सचिव,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव,<br>जि. सातारा | अध्यक्ष,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव,<br>जि. सातारा |
| | | **मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) :**<br>१)अपीलकर्त्याची सभासद वर्गणी न स्वीकारल्यामुळे अपीलकर्त्याने बँक ऑफ इंडियामध्ये संस्थेच्या खात्यात (खाते क्र. S B १९३९ ) जमा केली. परंतु त्याबाबत कसलीही माहिती अथवा पावती मिळाली नाही. त्याबाबतचा लेखी खुलासा मिळावा.<br>२) सन २००६-२००७ साल चे संस्थेचे ऑडिट रिपोर्ट | | |
| ३ | ५४८ / सातारा | श्री. प्रताप तावबा घाडगे<br>मु. पो. डिस्कळ, ता. खटाव,<br>जि.सातारा | सचिव,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव<br>जि. सातारा | अध्यक्ष,<br>श्री शिवाजी शिक्षण संस्था,<br>मु. पो. डिस्कळ, ता.खटाव,<br>जि. सातारा |
| | | **मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) :**<br>१)अपीलकर्त्याची सभासद वर्गणी न स्वीकारल्यामुळे अपीलकर्त्याने बँक ऑफ इंडियामध्ये संस्थेच्या खात्यात (खाते क्र. S B १९३९ ) जमा केली. परंतु त्याबाबत कसलीही माहिती अथवा पावती मिळाली नाही. त्याबाबतचा लेखी खुलासा मिळावा.<br>२) सन २००५-२००८ पर्यंतचे ऑडिट रिपोर्ट | | |

| | | |
|---|---|---|
| | | ३) दिनांक ०२-१२-०७ रोजी जी संचालक मंडळाची निवड केली त्यावेळेच्या सभासद यादीनुसार ११५९ सभासदांमधून फक्त ७८ सभासदांनाच मतदानचा हक्क दिला ते सर्व आजी व माजी संचालकांचे नातलग आहेत, असे का याबाबत खुलासा मिळावा. |

## विवेचन

वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार अपीलकर्ते अनुक्रमे सर्वश्री जनार्दन गजानन आडके, तुकाराम बाळा जाधव व प्रताप तावबा घाडगे या तीन अपीलकर्त्यांनी वरील संस्थेकडे थोडयाफार फरकासह जवळ जवळ एकाच प्रकारची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, डिस्कळ, ता.खटाव यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, मु. पो. डिस्कळ, ता.खटाव, जि. सातारा व तद्नंतर राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत. उपरोक्त तिन्ही अपिलांचा समावेश दिनांक ५-०२-२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास 'आठ दिवसांत पुन्हा माहिती देण्याचे' नमूद केले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांना तत्पूर्वी दिनांक २०-०९-२००८ रोजी पोस्टाचा दाखला घेऊन व दिनांक ५-०२-२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर दिनांक २६-०२-२००९ रोजी व्यक्तिशः अशी दोन वेळा माहिती दिलेली आहे. दिनांक १९-०३-२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी तसे आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तक्त्यातील एकूण तीन अपिले अनुक्रमांक १ ते ३ ( अपील क्र. ५४६/सातारा, ५४७/सातारा व ५४८/सातारा निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

मेजर उदय साठे
सत्संग प्लॉट नं.९६, सर्व्हे नं.१, वडगाव शेरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५७ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** मेजर उदय साठे
सत्संग प्लॉट नं.९६, सर्व्हे नं.१, वडगाव शेरी, पुणे-१४

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भानुदास माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे महानगरपालिकेच्या ज्या सेवकांनी मिळकतकर भरलेला नाही त्यांची माहिती व न भरल्याबाबत त्यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती. पुणे महानगरपालिकेच्या ज्या सेवकांना शासकीय जमिनी दिलेल्या आहेत त्या सोसायट्यांची व व्यक्तिगत जमिनी दिलेल्या आहेत त्याची यादी, नाव, पत्ता, शहर मिळकत क्रमांक इ. |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर न भरणाऱ्या सेवकांबाबतची, तसेच महानगरपालिकेच्या सेवकांना निवासी संकुले बांधण्यासाठी शासनाकडून व महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या जागांबाबतची महानगरपालिकेच्या स्थापनेपासून (सन १९५२) सन २००६ पर्यंतची माहिती अपीलकर्ता मेजर उदय साठे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त(ज), पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे कारणावरुन मेजर साठे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका यांनी माहितीची मागणी अतिव्याप्त असल्याचे नमूद करुन अपील अंशतः मान्य केले, व 'दोन महिन्यांच्या कालावधीत कर आकारणी व कर संकलन कार्यालय व उपायुक्त भू-संपादन व व्यवस्थापन कार्यालय यांना माहिती संकलित करुन मेजर साठे यांना द्यावी जी माहिती उपलब्ध नसेल त्याबाबत मेजर साठे यांना कळविले जावे,' असा आदेश दिला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (ज), पुणे महानगरपालिका श्री.शिरीष यादव यांनी मुळात १८ दिवस विलंबाने माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विलंबाबद्दल श्री.यादव यांना कोणतीही शास्ती लावली नाही, म्हणून मेजर साठे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दि.१६.५.२००६ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी श्री.शिरीष यादव यांनी दि.४.७.२००६ रोजी उत्तर दिले. थकबाकीदार असणाऱ्या सर्व सेवकांची माहिती न देता

केवळ १३९ लिपिकांची माहिती दिली. नागरिकांच्या दृष्टीने गंभीर स्वरुपाच्या असलेल्या या विषयाकडील पाहणीचा अनास्थेचा व बेफिकिरीचा दृष्टिकोन त्यातून दिसून येतो, असे प्रतिपादन मेजर साठे यांनी केले.

जन माहिती अधिकारी सुनावणीला उपस्थित नव्हते. अनुपस्थितीबाबत व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार ५५ वर्षांची माहिती प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार दोन महिन्यांत देण्याची कार्यवाही तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिरीष यादव यांनी केलेली नाही, याबाबत त्यांचा खुलासा घेऊन एका आठवड्यात आयोगाला अहवाल सादर करावा. तसेच मेजर साठे यांना माहिती दिल्याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा घेऊन राहिलेली माहिती त्वरित पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. 'तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिरीष यादव यांनी माहिती दिली की नाही हे खात्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन आढळ होत नाही. तथापि मिळकत कराची रक्कम न भरलेल्या सेवकांनी ही रक्कम त्वरित भरावी, अन्यथा त्यांच्या वेतनातून ती कपात करण्यात यावी, असा आदेश दि.२४.३.२००६ रोजी प्रसृत करण्यात आल्याचे दिसते. मेजर साठे यांच्या मागणीप्रमाणे सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडून पुन्हा माहिती घेऊन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तुत माहिती व्याप्त स्वरुपाची असल्याने कालावधी लागणार आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त(वि), पुणे महानगरपालिका यांनी दि.१४.८.२००८ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले.

वस्तुतः मेजर साठे यांचा अर्ज दि.२६.५.२००६ चा असून दि.१४.८.२००८ रोजी ही माहिती देण्यास कालावधी लागेल, असे अपिलीय प्राधिकारी नमूद करतात, यावरुन जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत तत्परता दर्शविलेली नाही, हे स्पष्ट होते. त्याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शिरीष यादव यांच्याकडून घेऊन सादर करण्याच्या आयोगाच्या आदेशाची पूर्तता अद्याप झालेली नाही, ही गंभीर बाब आहे.

आयोगाच्या आदेशानुसार मेजर साठे यांना पुणे महानगरपालिकेकडील सेवकांच्या गृहरचनेसाठी देण्यात आलेल्या जागा व इतर मुद्दे याबाबतची माहिती पूर्वी देण्यात आलेली होती.

ऊर्वरित माहिती देण्यात आल्याचे संबंधित माहितीच्या प्रतींसह उपायुक्त, भू-संपादन व व्यवस्थापन यांनी दि.२७.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री.शिरीष यादव यांचा खुलासा घेऊन सादर करण्याच्या आयोगाच्या मौखिक आदेशाची पूर्तता का केली नाही, याचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका श्री.उमाकांत दांगट यांनी दि.१५.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) माहिती देण्यास झालेला विलंब व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार कार्यवाही न केल्याची कारणे याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त(ज), पुणे महानगरपालिका श्री.शिरीष यादव यांनी दि.१५.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यांच्याकडून हा खुलासा घेऊन सादर करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांची राहिल. वरील खुलाशानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

पुणे
दि.३०.०९.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तम मारुती कांबळे
१२/६, भोरडेनगर, थेरगाव, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७० / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११ .६ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तम मारुती कांबळे
१२/६, भोरडेनगर, थेरगाव, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.सं.मा.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.बी.बी.पोखरकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००६ व ३१.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>एम.पी.इंटरप्रायजेस आणि मल्टीपल सर्व्हिसेस या संस्थांनी तक्रार अर्जाबाबत कामगार उपआयुक्त कार्यालयाला दिलेला खुलासा. कामगार उपआयुक्त कार्यालय,पुणे यांच्या कार्यालयीन आवक क्र.७९०७ च्या नोंदणीनुसार दि.१८.५.२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत कामगार उपआयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती. | |

## विवेचन

दोन संस्थामध्ये कामगार असल्याचे दाखवून शासनाची फसवणूक केल्याबद्दलच्या तक्रारीवर कामगार उपआयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.उत्तम मारुती कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, कामगार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.कांबळे यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकाऱ्यांनी फेटाळले.

श्री.कांबळे यानी अर्ज केल्यानंतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडे तो पाठवून माहिती संकलीत करण्यात आली व ती त्यांना देण्यात आली. दोन वेळा माहिती दिली त्यातील खरी माहिती कोणती व अनावश्यक माहिती का दिली, अशी विचारणा श्री.कांबळे यांनी आयोगाकडील अपील-अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते, परंतु श्री.कांबळे उपस्थित नव्हते. श्री.कांबळे याना दि.१९.६.२००६ पर्यंत उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. त्यानंतर या विषयाबाबतची अधिक माहिती उपलब्ध झाल्यामुळे दि.३१.७.२००६ रोजी ती पुरविण्यात आली. अभिलेखाच्या आधारे योग्य माहिती पुरविण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.बी.

पोखरकर व अपिलीय प्राधिकारी श्री.सं.मा.मोरे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. ते योग्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र वामन पवार
मु.पो.उडतारे, ता.वाई, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय वाहतूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सातारा विभाग, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, — उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७६/ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राजेंद्र वामन पवार
मु.पो.उडतारे, ता.वाई, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय वाहतूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सातारा विभाग, सातारा
श्री.कैलास बी.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सातारा विभाग, सातारा
सौ.संमुक्ता वि.महाडिक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १५.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १८.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १५.०१.२००९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

१) सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर यंत्र अभियंता (चालन) राज्य परिवहन, सातारा व विभागीय वाहतूक अधिकारी, रा.प. सातारा यांनी दि. २९ ते ३१.१२.२००४ अखेर तीन दिवस एकूण ४८ उमेदवारांची अंतीम वान चालन चाचणीमध्ये उमेदवारांचे पात्र व अपात्र यांचे निकष काय होते

२) दि. २९ ते ३१.१२.२००४ मधील ४८ उमेदवारांच्यापात्र व अपात्र विषयी पुर्ण माहिती व लावलेले निकष यांची संपूर्ण माहिती

## विवेचन

राज्य परिवहन महामंडळ, सातारा विभाग यांनी घेतलेल्या वाहनचालक चाचणीमध्ये निवड झालेल्या ४८ उमेदवारांच्या श्रेणीसह यादी आपल्याला मिळाली नाही व निवडीचे निकष कोणते हे आपल्याला समजले नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.राजेंद्र वामन पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

निवड झालेल्या यादीत आधी आपला क्रमांक वर होता, तो नंतर खाली गेला, म्हणजे माहिती चुकीची आहे. निवड झालेल्यांना पात्र कसे ठरविले ही माहिती त्यांच्या श्रेणीसह आपल्याला मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.पवार यांनी केले. चाचणी घेतलेल्या उमेदवारांसहीत एबीसी शेऱ्यांबाबतची फक्त माहिती मिळावी, असे श्री.पवार यांनी दि.५.२.२००२ च्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केले होते.

श्री.पवार यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली. त्यांनी मागणी केलेले त्यांचे गुणपत्र आपल्या शाखेत उपलब्ध नसल्याने ते वाहतूक निरीक्षक यांच्याकडून घेऊन त्यांना देण्यात आले. त्यांच्या चाचणीचा अहवालही त्यांना देण्यात आला आहे. चाचणीमध्ये त्यांची निवड झाली होती, परंतु प्रशिक्षणात ते अपात्र ठरल्यामळे त्यांची निवड झाली नाही. निवडीविषयीच्या निकषांचे परिपत्रक त्यांना पूर्वी देण्यात आले आहे. इतर उमेदवारांच्या श्रेणीसह यादी गोपनीय म्हणून देण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी सौ. संमुक्ता व.महाडिक व अपिलीय प्राधिकारी श्री.कैलास बी.देशमुख यांनी प्रपत्रात नमूद केले आहे, त्याचाच पुनरुच्चार त्यांनी सुनावणीत केला.

श्री.पवार यांना संबंधित माहिती देण्यात आली आहे. निवड झालेल्या अन्य उमेदवारांना मिळालेली श्रेणी हा सार्वजनिक प्राधिकरणामधील कामकाजाशी निगडीत असलेला भाग असून गोपनीय म्हणता येणार नाही. त्यामुळे ती यादी दिली जाणे आवश्यक आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) उमेदवार निवडीचे निकष नमूद करणाऱ्या शासकीय परिपत्रकाची प्रत श्री.पवार यांना पुन्हा द्यावी. तसेच निवड झालेल्या ४८ उमेदवारांची त्यांना परीक्षेत मिळालेल्या श्रेणीसह यादी द्यावी. दि.२५.९.२००९ पर्यंत याची पूर्तता करुन अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी सौ.संमुक्ता व महाडिक यांनी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड. दौलत वि.मोरे
मु.पिंपरेखुर्द, पो.निरा,ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती निरी, ता.निरा, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती निरी, ता.निरा, जि.पुणे
श्री. सतिश विष्णु शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०८.०३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.०८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.०९.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-**<br><br>कृषी उत्पन्न बाजार समिती, नीरा येथील सौ.मंगला सर्जेराव भोसले यांच्याप्रमाणे इतर गाळे धारकांवर अतिक्रमणाबद्दल कारवाईसंदर्भात नोटिसा का काढल्यानाहीत? त्यांना दिलेल्या नोटीसा, सदर अतिक्रमणधारकांवर केलेल्या कार्यवाईच्या अनुषंगाने माहिती |
|---|---|

## विवेचन

दि.११.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड.दौलत व्ही.मोरे यांनी सौ.मंगला सर्जेराव भोसले यांच्यावर बेकायदेशीर गाळा बांधकामाबाबतच्या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. परंतु त्यांना नोटीस देण्यापलीकडे कोणतीही कारवाई कृषी उत्पन्न बाजार समितीने केलेली नाही. इतर सहा गाळेधारकांविरुध्द अतिक्रमणाबद्दल का कारवाई केली नाही, अशी विचारणा ॲड.मोरे यांनी केली होती. त्या गाळेधारकांवरही कारवाई केलेली नसून संबंधित विषय सामोपचाराने निकाली काढण्यासाठी बाजार समिती प्रयत्नशील असल्याचे ॲड.मोरे व सौ.भोसले यांनाही त्या त्या वेळी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, निरा श्री.सतीश विष्णू शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. खुलासा अथवा स्पष्टीकरणाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि १५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीम. पद्मा मनोहर बाळकृष्ण
इमारत क्र.२१, रुम नं.१५१९, अभ्युदयनगर,
काळाचौकी, मुंबई-३३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** १) तहसीलदार जावळी, ता.जावळी, जि.सातारा
२) तहसीलदार महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा
३) उप विभागी अधिकारी सातारा, जि.सातारा
४) उप वन संरक्षक, वन विभाग सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** १) तहसीलदार जावळी, ता.जावळी, जि.सातारा **उत्तरवादी**
२) तहसीलदार महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा
३) उप विभागीय अधिकारी सातारा, जि.सातारा
४) सहा. वन संरक्षक, वन विभाग सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८५+५८६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार जावळी, ता.जावळी, जि.सातारा
तर्फे प्रतिनिधी निवासी नायब तहसीलदार जावळी श्री. बी.एन.कोंडे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार महाबळेश्वर ता. महाबळेश्वर, जि.सातारा
तर्फे प्रतिनिधी निवासी नायब तहसीलदार महाबळेश्वर श्री. वाय.बी. सापते

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप वन संरक्षक, वन विभाग, सातारा
श्री. सरफराज खान

जन माहिती अधिकारी तथा १) निवासी तहसीलदार जावळी, ता.जावळी, जि.सातारा
श्री. बी.एन.कोंडे

२) निवासी तहसीलदार महाबळेश्वर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा
श्री. वाय.बी. सापते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ६.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २२.१०.२००८, २७.११.२००८, २३.१.२००९, २९.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ३.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ३०.१२.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

मौजे भुतेघर, ता.जावळी, जि.सातारा येथील फॉरेस्ट सर्व्हे नं. / गट नं. ३९ मधील जमिनीच्या अभिलेखात श्रीमती कलाबाई पां. मानकुंबरे व श्री.पांडुरंग मानकुंबरे यांची नावे नोंद करणेबाबत अर्जदाराने १९९७-९८ व २००६-०७ मध्ये केलेले विनंती अर्ज तसेच दिनांक १८.८.२००८ व दिनांक २४.८.२००८ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती.

## विवेचन

माजी सैनिक श्री.पांडुरंग मानकुंबरे व श्रीमती कलाबाई मानकुंबरे यांना सन १९६८-६९ मध्ये वाटप केलेली जमीन आपल्या नावे नमूद करुन मिळण्याच्या संदर्भात आपण केलेल्या अर्जावर कार्यवाही न झाल्याच्या कारणावरुन अपीलकर्त्या श्रीमती पद्मा मनोहर बाळकृष्ण यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्रीमती पद्मा मनोहर बाळकृष्ण या विषयाबाबत तहसीलदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, महसूल व वन विभाग आदी विविध पातळ्यांवर गेल्या काही वर्षांपासून अर्ज करीत आल्या आहेत. माहितीच्या अधिकारात याच स्वरुपाची मागणी त्यांनी विविध विभागांकडे केली आहे. या जमिनीबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली, असे प्रतिपादन संबधित तहसीलदारांचे प्रतिनिधी श्री.बजरंग नारायण कोंडे (नि.ना.त.जावळी), श्री.युवराज बाबुराव साप्ते (नि.ना.त.महाबळेश्वर) व उपवन वनसंरक्षक, सातारा श्री.सरफराज खान यांनी केले. या संदर्भात वेळोवेळी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

संबंधित जमीन श्री.पांडुरंग मानकुंबरे यांना दिल्याची कोणतीही कागदपत्रे वा तसा आदेश उपलब्ध नाही. तसेच श्रीमती पद्मा मनोहर बाळकृष्ण यांची माहितीची मागणी नसून नाव लावून जमीन मिळण्याची आहे, असे या कागदपत्रांवरुन दिसते. या संदर्भात श्रीमती बाळकृष्ण यांच्याकडे पुरावे असल्यास ते दाखल करुन त्यांनी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तसे त्यांना कळविण्यात आले, तसेच पुराव्याच्या

कागदपत्रांसह उपस्थित राहण्यास विभागीय आयुक्तांसह विविध अधिकाऱ्यांनी कळवूनही असे पुरावे त्यांनी सादर केलेले नाहीत, असे उपस्थित प्रतिनिधींनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता श्रीमती बाळकृष्ण यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. तरीही मूळ प्रश्नाबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी प्रशासकीय पत्रव्यवहार केला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.९.२००९**